कोपरी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस
ठाणे शहर

पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ९८७ /२०२६ दि. ११ /०९/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, कोपरी वाहतूक उप विभागाचे हद्दीत अष्टविनायक चौक ते कष्टमखाडी या मार्गावर गणपती विसर्जन मिरवणुका निघत असतात. सदर मार्ग अतिशय अरूंद असुन एकावेळी दोन्ही लेनवर एक वाहन जाऊ शकते. सदर कालावधीत विसर्जन मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	१) कोपरी अष्टविनायक चौक मार्गे कष्टमखाडी रोडने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **अष्टविनायक चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने अष्टविनायक चौक येथून डावे वळण घेऊन नारायण कोळी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच अष्टविनायक चौक येथून उजवे वळण घेऊन आनंद दिघे चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
नो पार्किंग –	अष्टविनायक चौक ते कष्टमखाडी दरम्यान रस्त्याच्या दोन्ही बाजुस सर्व प्रकारच्या वाहने पार्कीग करण्यास **मनाई करण्यात** येत आहे.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना **दि.१५/०९/२०२६ रोजी (दीड दिवसाचे), दि.१८/०९/२०२६ रोजी (पाच दिवसाचे), दि.१९/०९/२०२६ (गौरी गणपती विसर्जन), दि.२०/०९/२०२६ (सात दिवसाचे) व दि.२५/०९/२०२६ रोजी (अनंत चतुर्दशी)** या कालावधीत **दुपारी १४.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत** अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मूर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,ठाणे
२/–सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर
मा. पोलीस आयुक्त,ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त,ठाणे शहर
मा. अप्पर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,ठाणे शहर
मा. जिल्हाधीकारी,ठाणे
मा. आयुक्त,ठाणे महानगरपालीका,ठाणे
मा. पोलीस उप आयुक्त,परिमंडळ–१,ठाणे.परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे
प्रत कार्यवाहीसाठी,
प्रादेशिक परीवहन अधिकारी,ठाणे
परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालीका,ठाणे,बृहनमुंबई व वसई विरार महानगरपालीका
नियंत्रण कक्ष अधिकारी,ठाणे
विभाग नियंत्रण,महाराष्ट्र राज्यपरीवहन ठाणे

प्रत– पोलीस उप आयुक्त,अर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/सदरची अधिसुचना नागरीकांचा माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेब साईटवर प्रसिध्द होण्यास विनंती आहे.

प्रत– समन्वय अधिकारी,९ एएस कक्ष,ठाणे
२/–सदरची अधिसुचना पोलीस नोटीस मध्ये प्रसिध्दी साठी

प्रत– सपोआ वाहतुक विभाग,ठाणे व सर्व संबधित प्रभारी अधिकारी,वाहतुक उपविभाग
२/–मनपा,ठाणे चा संबंधीत अधिकाऱ्या कडुन आवश्यक सुचना फलक लावुन घ्यावेत.